आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२९ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- सोमवारपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उद्या सर्वपक्षीय बैठक

- केवळ सव्वा ३ लाख शेतकऱ्यांनी घेतला रब्बी हंगामासाठी पीक वीमा

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बातमधून देशवासियांशी संवाद साधणार

**आणि**

- भारताचा हॉकी संघ सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलवली आहे. लोकसभा आणि राज्यसभेतल्या सर्व पक्षांच्या नेत्यांशी संसदीय कार्य मंत्री किरेन रीजिजू चर्चा करणार आहेत. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकार सर्व पक्षाच्या सदस्यांना विनंती करेल.

**<><><><><>**

राज्यातल्या २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार संपायला २ दिवस शिल्लक आहे. त्यामुळं राज्यभरात सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत आहेत. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

- **- होल्ड - व्हाइस कास्ट - -**

*(मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगरपरिषद निवडणुकीसाठी आज चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रापूर इथं प्रचारसभा घेतली. विकास आराखडा घेऊन भाजपा जनतेकडे जात आहे. भाजपाकडे निती, नियत आणि निधी असल्याने भाजपाच्या उमेदवारांना निवडून द्यावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. याशिवाय वाशिम आणि गडचिरोली इथं मुख्यमंत्र्यांनी प्रचारसभा घेतली. सत्ता आली तर गडचिरोलीला स्मार्ट सिटी बनवू असं आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलं.*

*उप मुख्यमत्री एकनाथ शिंदे यांनी उदगीर इथं प्रचारसभा घेतली. शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन त्यांनी मतदारांना केलं.*

*छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गंगापूर इथं भाजपाचे खासदार डॉक्टर भागवत कराड यांनी तर कन्नड इथं आमदार संजय जाधव यांनी प्रचारसभा घेतली. गंगापूर शहर सक्षम, सुरक्षित आणि सुंदर बनवण्याचा भाजपाचा संकल्प असल्याचं कराड म्हणाले. तर संजय जाधव यांनी कन्नड शहरासाठी कोणकोणती विकासकामं करण्यात येतील याची विस्तृत मांडणी केली. धाराशिवमधे पालकमंत्र प्रताप सरनाईक यांनी काल शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतली.*

*पुणे महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार नाहीत तसंच महायुतीतल्या कोणत्याही पक्षाबरोबर युती करणार नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते प्रशांत जगताप यांनी सांगितलं.*

***दरम्यान,** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची धामधुम सुरू असताना टिटवाळा इथं शिवसेना कार्यकर्त्याची काल रात्री हत्या झाली. चार ते पाच अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर चाकूने हल्ला केला. रुग्णालयात पोहोचण्याआधीच त्याचा मृत्यू झाला. या हत्येमागे संपत्तीचा वाद किंवा एखादा जुना वाद आहे का किंवा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतल्या वादामुळे ही हत्या झाली आहे का याचा तपास केला जाईल असं पोलिसांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

सिंधुदुर्ग पोलिसांनी शिवसेना आमदार निलेश राणे यांच्यासह ३-४ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. भाजपाचे पदाधिकारी विजय केनवडेकर यांच्या घरी केलेल्या घुसखोरी प्रकरणी केनवडेकर यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल झाला. यामागे भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा हात असल्याचा आरोप राणे यांनी केला आहे. गुन्हा उघड करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. गुन्हा करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल होत नाही, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

रब्बी हंगामातील पीक विम्यासाठी आत्तापर्यंत केवळ ३ लाख २६ हजार १६८ शेतकऱ्यांनी २ लाख ६ हजार ९९५ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरवला आहे. गेल्या वर्षी सुमारे

५५ लाख शेतकऱ्यांनी हा विमा उतरवला होता. राज्यातील विमा उतरवलेल्या क्षेत्राची एकंदर विमा रक्कम ८२० कोटी रुपये आहे. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार परभणी जिल्ह्यात सर्वाधिक ५० हजार ४६२ शेतकऱ्यांनी ३३ हजार १२ हेक्टरवरील क्षेत्राचा विमा उतरवला आहे. त्यापाठोपाठ बीड आणि लातूर जिल्ह्याचा क्रमांक आहे. शेवटच्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात अर्ज येतात. त्यामुळं तांत्रिक समस्या निर्माण होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी मुदत संपण्यापूर्वीच पीक विमा उतरवण्याचं आवाहन पुणे  कृषी विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

देशाला बदलत्या तंत्रज्ञानानुसार आत्मनिर्भर होण्यासाठी सैन्य दलात दाखल होणाऱ्या छात्रांनी सक्षम असणे आवश्यक असल्याचं प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगाचे प्रमुख डॉ. अजय कुमार यांनी आज पुण्यात केलं. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४९ व्या तुकडीच्या दीक्षांत सोहळ्यात ते बोलत होते.  यावेळी ३२९ स्नातकांना त्यांनी पदवी प्रदान केली. त्यापैकी १५ मित्र देशातले आणि १५ महिला आहेत. विज्ञान शाखेचं रौप्य पदक कार्तिक महेश्वरी, संगणक विज्ञानातलं रौप्य पदक अनन्या बालोनी, कला शाखेतलं रौप्य पदक अनुराग गुप्ता, बी टेक रौप्य पदक पुण्याचा विश्वेष भालेराव यांना मिळालं.

**<><><><><>**

मुंबईतल्या वायू प्रदूषणाच्या वाढत्या आव्हानाचा सामना करण्यात राज्य सरकार अपयशी ठरल्याची टीका काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी केली  आहे. त्या मुंबईत हवेच्या गुणवत्ता विषयावर काँग्रेसकडून आयोजित बैठकीत आज बोलत होत्या. दूषित हवेमुळे दरवर्षी मुंबईतले ५ हजार शंभर लोक आपले प्राण गमावतात असं गायकवाड यांनी हावर्ड विद्यापीठाच्या अभ्यासाचा हवाला देऊन सांगितलं.

**<><><><><>**

कुंभमेळ्याच्या निमित्तानं नाशिकच्या पर्यावरणाला हानी पोहोचेल अशा पद्धतीनं वृक्षतोड होऊ नये अशी मागणी अभिनेते सयाजी शिंदे यांनी केली आहे. आगामी कुंभमेळ्यानिमीत्त नाशिकमधल्या तपोवन इथं साधुग्राम उभारण्यासाठी वृक्षतोड केली जाणार आहे. या वृक्षतोडीला स्थानिक आणि पर्यावरणप्रेमींनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर सयाजी शिंदे यांनी तपोवनला भेट दिली आणि पर्यावरण चळवळीतील

कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली. या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचंही त्यांनी जाहीर केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पर्यावरण प्रेमींच्या भावना समजून घ्याव्यात असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या रविवारी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२८वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, वेबसाइट तसंच न्यूजऑनएयर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचं औचित्य साधत राज्याच्या पर्यटन संचालनालयानं येत्या 3 ते 5 डिसेंबर दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीटचं आयोजन केलं आहे. मुंबईतल्या चैत्यभूमीला भेट देणाऱ्या अनुयायांसह पर्यटकांसाठी हे टूर सर्किट निःशुल्क असणार आहे. याअंतर्गत चैत्यभूमी, राजगृह, वडाळ्यातलं डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स आणि कॉमर्स महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, परळमधली बीआयटी चाळ आणि फोर्टमधल्या सिद्धार्थ महाविद्यालयाचा समावेश आहे. टूर सर्कीट अंतर्गत दररोज 3 बसेस उपलब्ध करण्यात आल्या असून प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश देण्यात येईल. सहलीमध्ये सहभागी होणारे पर्यटक/अनुयायी यांच्यासाठी निःशुल्क प्रवास, सहल मार्गदर्शक, अल्पोपहार आदी सोयी-सुविधा पर्यटन संचालनालयाद्वारे पुरविण्यात येणार आहेत. सदर टूर सर्कीटची सुरुवात चैत्यभूमी, दादर, मुंबई येथून सकाळी 9.30 वाजता होऊन सहलीचा समारोप चैत्यभूमी दादर येथे होणार आहे.

<><><><><>

महिलांवरचे अत्याचार रोखण्यासाठी सर्व सरकारी विभाग, निमशासकीय संस्था तसेच खासगी आस्थापनांनी लैंगिक छळ प्रतिबंध कायद्याची काटेकोर अंमबलबजावणी करण्यासाठी सर्व आस्थापनांनी तातडीनं अंतर्गत समिती स्थापन करावी असं आवाहन महिला आणि बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केलं आहे. ज्या कार्यालयं आणि आस्थापनांमध्ये दहा किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी अंतर्गत समिती

स्थापन करणं बंधनकारक असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. अशी अंतर्गत समिती स्थापन केल्यानंतर त्याबाबतची माहिती शी बॉक्स डॉट डब्ल्यू सी डी डॉट जी ओ व्ही डॉट इन या पोर्टलवर अपलोड करावी अशी सूचनाही त्यांनी केली आहे.

या कायद्यातल्या तरतुदींचं पालन झालं नाही तर ५० हजार रुपयांपर्यंतचा दंड, उल्लंघनाची पुनरावृत्ती झाली तर दंडात दुपटीनं वाढ, आस्थापनेचा परवाना रद्द करणं आणि इतर कठोर कारवायांची तरतुद असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

भारताचा हॉकी संघ सुलतान अजलनशाह चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. इपोह इथं झालेल्या उपान्त्य सामन्यात भारतानं कॅनडावर १४ विरुद्ध ३ अशा गोलफरकाने दणदणीत विजय मिळवला. जुगराज सिंगने ४ गोल केले.

दुसरा उपान्त्य सामना बेल्जियम आणि न्यूझीलंडमधे होणार आहे. मात्र बेल्जियम गुणतालिकेत १० गुण मिळवून अव्वल स्थानी आहे. न्यूझीलंडला अंतिम फेरीत पोहोचायचं असेल तर त्यांना उपान्त्य सामना किमान ६ गोलफरकाने जिंकावा लागेल.

**<><><><><>**

मुंबई येथील जोश अर्थात ज्वेलरी ऑक्युपेशनस स्किलिंग हब इथं आजपर्यंत ७५० उमेदवारांनी प्रशिक्षण घेतलं असून त्यापैकी १२७ जणांनी अत्याधुनिक दागिने उत्पादन कौशल्य प्राप्त केलं आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांच्या संकल्पनेतून जोशची स्थापना झाली आहे. यातल्या सर्व प्रशिक्षणार्थींना शंभर टक्के प्लेसमेंट मिळाली असून बहुसंख्य उमेदवारांची निवड मुंबईतील अग्रगण्य ज्वेलरी एक्सपोर्ट कंपनी असलेल्या ज्वेल एक्स मधे झाली आहे.

**<><><><><>**

क्षयरोगमुक्त भारत अभियानांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात एक्स-रे तपासणी आणि जनजागृती उपक्रम राबवला जात आहे. यात १ जुलैपासून आतापर्यंत जिल्ह्यातल्या दोन लाख ३६ हजार ४९४ नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यातून १३१ जणांना क्षयरोग असल्याचं निष्पन्न झालं.

**<><><><><>**

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासह शासन व्यवस्था अधिक पारदर्शक करण्याच्या उद्देशानं रत्नागिरीच्या लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयानं नागरिकांसाठी 7038 39 10 64 हा विशेष व्हॉट्सअॅप हेल्पलाइन क्रमांक सुरू केला आहे. या व्यतिरिक्त १०६४ हा निःशुल्क क्रमांक तसंच २२ २८ ९३ हा दूरध्वनी क्रमांकही अशा प्रकारच्या तक्रारी नोंदवण्यासाठी उपलब्ध असणार आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी कोणत्याही कामासाठी लाच मागितली किंवा त्यांचा एखादा व्यवहार संशयास्पद वाटला तर या हेल्पलाईन क्रमांकावर तात्काळ तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

**<><><><><>**

राज्यात गेले चोवीस तास सर्वत्र हवामान कोरडं होतं. विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीपेक्षा किंतिच घट झाली. गेल्या चोवीस तासात सर्वात कमी तापमान गोंदिया इथं १० पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

राज्यात पुढचे दोन दिवस सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर विदर्बात तुरळक ठिकाणी पाऊस होईल अशी शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**